# प्रेसनोट

दिनांक १४/०८/२०२०

**नगर पंचायत अर्धापुर येथील बालाजी गणपतराव हराळे व बालाजी चांदु पाटोळे यांना ५,००/– लाचेच्या रक्कमेसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांनी रंगेहाथ पकडले.**

दिनांक १३/०८/२०२० रोजी यातील तकारदार यांनी तकार दिली की, ''यातील लोकसेवक बालाजी हराळे व बालाजी पाटोळे यांनी तक्रारदार यांना त्यांच्या बहीनीचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी ५,००/– रू. लाचेची मागणी केली आहे.''.

तकारदार यांचे तकारीच्या अनुषंगाने लाचलुचत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन आज दिनांक १४/०८/२०२० रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये सहाय्यक कार्यालयीन निरीक्षक बालाजी हराळे यांनी तक्रारदार यांच्या बहीनीचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून आज दिनांक १४/०८/२०२० रोजी नगर पंचायत कार्यालय अर्धापुर ता. अर्धापुर येथे लावण्यात आलेल्या सापळयामध्ये आलोसे बालाजी हराळे यांनी तक्रारदार यांच्या बहीनीचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी शासकिय फिस व्यतिरीक्त ईतर ५००/– रु. ईतकी लाचेची मागणी करुन आलोसे बालाजी पाटोळे यांच्याकडे देण्यास सांगुन त्यांच्या मार्फतीने लाचेची रक्कम स्वीकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून (१) आरोपी लोकसेवक बालाजी गणपत हराळे, वय ५४ वर्ष, पद सहाय्यक कार्यालय निरीक्षक नगर पंचायत कार्यालय अर्धापुर रा. पवार गल्ली, जुना लोहा, ता. लोहा, जि. नांदेड (२) आरोपी लोकसेवक बालाजी चांदु पाटोळे, वय ३७ वर्ष, पद सफाई कामगार चार्ज आवक जावक लिपीक, नगर पंचायत कार्यालय अर्धापुर ता. अर्धापुर रा. हमु. लहुजीनगर, अर्धापुर ता. अर्धापुर मुळ रा. मौ. गुंज ता. वसमत, जि. हिंगोली यांचे विरूध्द पोलीस स्टेशन अर्धापुर जि. नांदेड येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रकिया चालु असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक कपिल पुंजाराम शेळके, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्रीमती कल्पना बारवकर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, पोलीस उप अधिक्षक श्री विजय डोंगरे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक कपिल पुंजाराम शेळके, पोना गणेश केजकर, एकनाथ गंगातिर्थ, जगन्नाथ अनंतवार, सचिन गायकवाड, विलास राठोड, शेख मुजिब यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना अवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कंमाकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन कंमाक :– १०६४ (२) कार्यालयाचा फोन कंमाक ०२४६२–२५३५१२

३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल कंमाक ८९७५७६९९१८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

( विजय डोंगरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.

कार्यालय पोलीस उप अधिक्षक ला.प्र.वि.नांदेड

मा.संपादक, दैनिक ..........................................,

कृपया आपल्या लोकप्रिय दैनिकात सदर प्रेसनोट प्रसिध्द करावी.

Scanned by CamScanner